मनोगत । सत्यपाल महाराज

# गिरते को उठाना स्वर्ग मेरा!



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा वारसा चालविणारे संत म्हणून सत्यपाल महाराजांचे नाव आदराने घेतले जाते. एकाच वेळी नऊ खंजिऱ्या वाजविण्याचे कौशल्य त्यांना प्राप्त झाले असून, त्याद्वारे ते प्रबोधनाचा प्रयत्न करतात. समाजातील अंधश्रद्धा, जातीयवाद, जुन्या रूढी परंपरा, हुंडाप्रथा, कुपोषण, दारू व अंमली पदार्थांचे व्यसन, एडस्, शेतकरी आत्महत्या... या समाजातील अनिष्ट बाबींवर ते आपल्या कीर्तनातून प्रहार करतात. त्याचप्रमाणे कीर्तनातून लोकजागृती करीत लोकांना रक्तदान, नेत्रदान, वृक्षारोपण, पाणी अडवा पाणी जिरवा, महिला सबलीकरण, स्वदेशीचा स्वीकार, साक्षरता, मूल्य शिक्षण, सामुदायिक विवाह या चांगल्या गोष्टींसाठी प्रवृत्त करतात.

१० वर्षांचे वय होते तेव्हापासून मी राष्ट्रसंत तुकडोजींच्या गुरुदेव खंजेरी भजन मंडळात जात असे. त्यांचे भजन सिनेमा चालीवर असल्यामुळे मला आनंद वाटायचा. मातीच्या घागरीला फोडून त्याच्या वरच्या काठावर कागद लावून त्याला गरम करून अशी खंजेरी वाजवत होतो. मग काही दिवसांनंतर वडिलांनी लाकडाची खंजेरी आणून दिली आणि तेव्हापासून हा छंद जडला. आता मी एकूण ९ खंजेऱ्या एका वेळी वाजवून ११ प्रकारचे वेगवेगळे आवाज काढतो. मी अशा प्रकारच्या उलट्या खंजेऱ्या वाजविणारी जगातील पहिली व्यक्ती झालो. शाळेतून सांस्कृतिक कार्यक्रमांतून तयारी होत गेली. तसेच नाटकात लहानपणी काम केल्याने स्टेज डेअरिंग आले. माझ्यावर राष्ट्रसंत तुकडोजीच्या ग्रामगीतेचा, गाडगेबाबांचा, फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांचा परिणाम झाला. मनोरंजनातुन समाज प्रबोधन करताना मला सोबत माझा भाऊ गजानन जगन्नाथ चिंचोळकर याची ३० वर्षांपासून हार्मोनियम व आवाजाची साथ मिळाली. माझ्यासोबत तीन सहकलाकार असतात. माझा कार्यक्रम राष्ट्रसंतांच्या ग्रामगीतेवर आधारीत असतो. ही ग्रामगीता राष्ट्रसंतांनी शेतकरी, शेतमजुरांच्या जीवनाला अर्पण केली असून, त्यात एकुण ४१ अध्याय आहेत.

*तुझ्या श्रमास प्रतिष्ठा मिळो।*
*सकळाचे लक्ष तुझकडे वळो।*
*मानवतेचे तेज झळझळो। विश्वामाझीया।*
(ग्रामगीता)

गाडगेबाबांचे चरित्र मी वाचले, त्यांचे कीर्तनाने हजारो लोक जागृत झाले. देव दगडात नसून माणसात आहे, अंधश्रद्धा निर्मूलनाद्वारे शिक्षणालापण प्रोत्साहन दिले आणि याच प्रकारच्या विचाराने प्रेरित होऊन मी गेल्या ४० वर्षांपासून हे कार्य अहोरात्र करीत आहे. त्याच प्रकारे तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगांनी एक क्रांतिकारी परिवर्तन केले. अशाच प्रकारे फुले, शाहू, आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा प्रचार मी कित्येक वर्षापासून करीत आहे.

कीर्तनाच्या माध्यमातून एका महिन्यात अंदाजे २२ ते २५ दिवस माझे कार्यक्रम चालतात. त्यामधून दारूबंदी, व्यसनमुक्ती अंधश्रद्धा निर्मूलन, राष्ट्रीय एकात्मता, निर्मल ग्राम, हुंडाबळी अशा प्रकारच्या सामाजिक विषयांवर प्रबोधन करतो. तसेच तंटामुक्त गाव व स्त्री-पुरुष समानता, सामूहिक विवाह यावर आधारित आतापर्यंत १२ हजार कार्यक्रमांचे प्रयोग झाले. त्याचबरोबर माझ्या वाढदिवसाला आतापर्यंत एक हजार जोडप्यांचे सामूहिक विवाह लावले. माझा स्वत:चा विवाह, माझ्या भावाचा, पुतण्याचा, मुलीचा, भावाच्या दोन्ही मुलींचा, तसेच माझ्या ड्रायव्हरचासुद्धा विवाह मी सामूहिक पद्धतीनेच लावला. रंगपंचमीच्या दिवशी ग्रामसफाई करून कचरा पेटवून त्याची होळी केली. विधवा महिलांना कपडे वाटप, गरीब विद्यार्थ्यांना गणवेश वाटप अशा प्रकारचे कार्य केले.

उत्सवाचा व्हावा परिणाम।
म्हणून ठेवावे प्रभावी कार्यक्रम। (ग्रामगीता)
अपुल्या कष्टावरी जगावे कुणाचे उपकार अंगी न घ्यावे।
कमी खर्चाने राहावे साध्या घरी।।

या ओवीप्रमाणे अतिशय साध्या पद्धतीने मी माझे जीवन जगत आहे. त्यामध्ये

सकाळी थंड पाण्याने आंघोळ करणे,
आपले काम आपण करणे,
सरळ मार्गाने जगणे आणि उणे दिसे ते पूर्ण करी,
जगाचा तोल बोध सावरी।
आणि गिरते को उठाना स्वर्ग मेरा,
सबकी भलाई धर्म मेरा याप्रमाणे माझे जीवन आहे.
उद्योगीजन सर्व पुजारी पूजा तयाची ईमानदारी।
याप्रमाणे सामान्य जनतेसारखे जगणे आवडते.

सध्या समाजामधे तरुण पिढी अतिशय चमकबाज जीवन जगून मौजमस्ती करण्यामध्ये वेळ घालवत आहे. कमी श्रमात झटपट श्रीमंती मिळविण्यासाठी चुकीच्या मार्गाने अर्थार्जन करीत आहे, त्यासाठी दरोडे, चोरी, लूटमार आणि वेळ आल्यास खून करण्यास मागेपुढे पाहात नाहीत. अपघातांचे प्रमाण खूप वाढले आहे. अविचारी प्रवृत्ती तसेच देशहिताचा विचार न करता स्वहिताचा विचार करून फक्त स्वार्थी प्रवृत्तीने समाज घडत आहे. हे सर्व थांबवण्यासाठी समाजाच्या विचारांना संत चरित्राची माहिती असणे आवश्यक आहे आणि याचेच वर्णन ग्रामगीतेसारख्या ग्रंथामधून आपल्याला शिकायला मिळते.

ग्रामगीता नव्हे पारायणासी। वाचता वाट दावी जनासी।।

म्हणून अशा प्रकारच्या सत्यशोधक विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी मी माझ्या गावी 'गुरुवंदन सत्यशोधक संस्था' स्थापन केली आहे, आणि ही संस्था नोंदणीकृत असून त्याद्वारे रुग्णवाहिका सेवा गेल्या ५ वर्षांपासून सुरू केली आहे. २७ डिसेंबर २०१२ पासून येथे मनुष्य जागृतीचा उपक्रम सुरू होणार आहे. माझ्यासारखे सप्तखंजेरी वादक तयार करण्याचा मी निश्चय केला असून, आतापर्यंत १० ते १२ तरुणांनी या कार्याला प्रारंभ केला आहे.

**सत्यपाल महाराज**
मु.पो.ता. अकोट, स्टेशन रोड,
जि. अकोला ४४४१०१.
Mob. 9423128143

ओळख । गजानन जानभोर

# उपेक्षित समाजाचं प्राक्तन मांडणारा

सप्तखंजेरीवादक सत्यपाल महाराजांना संपूर्ण महाराष्ट्र ओळखतो. चाहते त्यांना 'महाराज' म्हणतात. 'सत्यपाल महाराज सिरसोलीकर' हे त्यांचं ग्रामीण भागातील लोकप्रिय नाव. स्वत: सत्यपालला मात्र 'महाराज' म्हटलेलं आवडत नाही. समाजातील इतर महाराजांचं कर्तृत्व (?) बघितल्यानंतर 'महाराज' या शब्दापासून जरा चार हात लांब राहण्याचा त्याचा प्रयत्न असतो.

एरवी इतर महाराजांसारख्या सामान्य माणसाला भुरळ पाडणाऱ्या कुठल्याही करामती न करता सत्यपाल चार दशकांपासून त्याच सामान्य माणसांच्या मनावर अधिराज्य गाजवून आहे. ज्या गावात सत्यपालच्या कीर्तनाचा कार्यक्रम असतो, त्या कार्यक्रमाची जाहिरात कुठल्याही वर्तमानपत्रात नसते. बातमी देण्याची आवश्यकता गावकऱ्यांना आणि सत्यपाललाही वाटत नाही. जाहिरात नाही, बातमी नाही, मार्केटिंगही नाही, तरीही हजारो बाया-बापड्या सत्यपालचं कीर्तन ऐकण्यासाठी येतात. प्रबोधनातील अनेक गोष्टी आत्मसात करतात आणि आयुष्याचं सार्थक झाल्याचं समाधान घेऊन घरी परततात.

हे 'अद्भुत' ('चमत्कार' हा शब्द सत्यपालला न आवडणारा) चाळीस वर्षांपासून आपण सारेच जण पाहात आहोत. आपल्या प्रत्येक कीर्तनाला एकवटणारा जनसमुदाय बघून एरवी एखाद्या महाराजाच्या मनात राजकारणात जाण्याची, निवडणूक लढण्याची महत्त्वाकांक्षा निर्माण झाली असती. किमान त्याला राजकीय गुरू तरी होता आलं असतं. पण सत्यपालला ते जमणं शक्य नव्हतं. कारण सामान्य माणसाचं प्रबोधन करणं, हा त्याचा धंदा नव्हे तर जीवनधर्म आहे. या जीवनधर्माच्या मुळाशी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गाडगेबाबांचा विचार रुजला असल्याने कुठल्याही आमिषाला सत्यपाल कधी बळी पडला नाही.

अत्यंत साध्या, सोप्या शब्दांत सत्यपाल ग्रामविकासाचा, प्रबोधनाचा विचार मांडतो. अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, हुंडाबळी, स्त्रीमुक्ती, साक्षरता, शिक्षण हे त्याच्या कीर्तनातील प्रमुख विषय. सामान्यांना समजेल आणि उमजेल, अशा पद्धतीने प्रबोधनाचा विचार तो मांडतो. मनोरंजनाच्या अंगाने जाताना डोळ्यांत अंजन घालण्याचं सामर्थ्यही त्याच्या भजनात असतं. समाजातील जातीयवादावर तो कळवळून बोलतो. जातीय विद्वेषाचा विखार कधीतरी संपायला हवा, ही त्याची तळमळ.

कारण या 'जाती'चे चटके त्याने सहन केले आहेत.

लहानपणी गावातल्या सावकाराकडे लग्न असलं की, सत्यपालच्या घराला कधीच आमंत्रण नसायचं. एकदा सत्यपालनं आईला विचारलं.

आई म्हणाली, 'आपण खालच्या जातीचे आहोत म्हणून...'

गावागावांतून फिरताना प्रत्येक ठिकाणी त्याला अजूनही ती 'जात' भेटत असते.

लोकांच्या मनातली जात आपण संपवू शकत नाही म्हणून सत्यपाल अस्वस्थ होतो, कळवळतो. गरिबीचे चटके सत्यपालने जन्मापासून भोगले.

सत्यपाल सहज बोलून जातो,

"माझी माय सावकाराकडे भांडे घासायची. मायची घरी परत यायची वेळ व्हायची तेव्हा आम्हांला खूप आनंद व्हायचा, कारण सावकाराच्या घरातील खरवटलेल्या भांड्यातील तूप आम्हांला खायला मिळायचं."

'या गरिबीने मला शाळेत जाता आलं नाही, मावशीकडे जाऊ शकलो नाही, मामाचं घर मला कधीच दिसलं नाही. पण याच गरिबीने मला शिकवलं आणि खंजेरीने घडवलं.'

सत्यपालच्या आयुष्यात आईचं स्थान देवापेक्षाही मोठं. ती दोन वर्गही शिकलेली नाही. पण तिने सत्यपालला घडवलं. सत्यपालच्या खंजेरीचे बोल कानी पडले की आपण त्या दिशेने धावत सुटतो, ती पुण्याई याच माय सुशीलाची. मुलानं शिकावं, मास्तर व्हावं, असं तिला वाटायचं पण

गरिबी आड यायची. मुंडगावच्या वसतिगृहात सत्यपालला शिकायला ठेवलं. पोराला पैसे पाठवावे लागतात म्हणून ती उपाशी राहायची. दोन पैशांचे शेंगदाणे घेऊन शेतावर कामाला जायची. फाटलेल्या तीन-चार लुगड्यांचे तुकडे एकत्र शिवून घालायची. कीर्तनाला आईची आठवण आली की, सत्यपाल विठ्ठल वाघांची कविता सहज म्हणून जातो, ''कापसाच्या बोंडाले चंद्र चोरूनिया पाहे, तरी माय माऊलीची मांडी उघडीच राहे''....

शाळेत असतानाची गोष्ट... प्रार्थनेच्या वेळी गुरुजींनी सत्यपालला रांगेतून बाहर काढलं, कारण त्याचे कपडे फाटलेले होते. ही गोष्ट त्याच्या जिव्हारी लागली. तो आत्महत्या करायला निघाला. मायनं त्याला थांबवलं. 'तू चोरी तर केली नाही ना! आपलं आयुष्यच फाटकं असेल तर त्याला गुरुजी तरी काय करणार? आत्महत्या करून आपल्या दुर्दैवाचे दशावतार थोडीच संपणार आहेत? त्यापेक्षा पोटापाण्यासाठी कमवायला शीक'... निरक्षर मायच्या तोंडून तो आयुष्याची 'गीताई'च ऐकत होता. येथूनच सत्यपाल घडू लागला. सत्यपाल गावात डबलरोटी विकू लागला, दुसरा भाऊ हॉटेलात कामावर होता. भजनांचा नाद सत्यपालला लहानपणापासूनच. तुकडोजी महाराजांचं, 'या झोपडीत माझ्या, आनंद साठवावा' हे माय सुशीलाचं आवडतं भजन.'सत्यपालला भजनांची आवड तुमच्यामुळे लागली का?' या प्रश्नावर माय सुशीलाचं उत्तर मिळत नाही. 'सत्यपाल पोटात असताना आसलगावला तुकडोजी महाराजांचं कीर्तन ऐकलं होतं' ही एकच आठवण त्या सांगतात, तेव्हा महाभारतातील गर्भातल्या अभिमन्यूची गोष्ट खरी वाटू लागते....

लहानपणी भजनी मंडळींच्या हातात असलेली खंजेरी सत्यपालला साद घालायची. पण खंजेरीला कुणी हात लावू देत नव्हतं. माय सुशीला हे सर्व बघायची. ती मडक्याला कागद लावून सत्यपालच्या हातात द्यायची. त्यावर सत्यपालची बोटं फिरायची. गावातले लोकं टिंगल-टवाळी करायचे. शाळेतले मास्तर चिडून म्हणायचे, 'सत्या वाया गेला, याचं आयुष्य खंजेरीतच वाहावत जाईल.' माय सुशीलाला मात्र आपल्या लेकराचं आयुष्य वेगळ्या वाटेनं घडवायचं होतं. गरिबीमुळे आपण पोराला शिकवू शकलो नाही, पण त्यानं समाजाला शिकवावं, ही या माउलीची तळमळ होती. सत्यपालने गाडगेबाबांना पाहिलं नाही, तुकडोजी महाराजांचंही सान्निध्य लाभलं नाही. मात्र, माय सुशीलाच्या रूपाने हे महापुरुष त्याच्या सतत सोबतीला होते. आकोटच्या बाजारात फाटक्या कपड्याचा एखादा गरीब मुलगा दिसला की सत्यपाल कळवळतो. त्याला नवीन कपडे घेऊन देतो. गरीब मुलांच्या शाळेची फी भरतो. गांजलेल्या जीवांबद्दलची ही कणव त्याला माय सुशीलाच्या अश्रूंनी दिली.

माय सुशीला सुरुवातीला खूप धार्मिक होती. कर्मकांडं करायची. सत्यपाल घडत गेला, तसतशी ही कर्मकांडं बंद होत गेली. आता सत्यपालच्या घरात कुठलंही कर्मकांड होत नाही. वटसावित्रीच्या दिवशी या माउलीच्या सुना वडाच्या झाडाला फेऱ्या मारीत नाहीत. अक्षयतृतीयेला घास टाकत नाही. देवीदेवतांच्या नावाचे उपवास धरत नाहीत, पोथ्याही वाचत नाहीत, घरातील आनंदाच्या प्रत्येक क्षणी गावातील गरीब जीवांना सामावून घेण्याची या सर्वांची धडपड असते.

दारिद्र्यामुळे आपल्याला शिकता आलं नाही, ही खंत सत्यपालला सतत बोचत असते. आपल्या वाट्याला आलं ते इतरांच्या वाट्याला येऊ नये, यासाठी त्याची सारखी धडपड सुरू असते. ज्या गावात कीर्तन असतं त्या गावातील हुशार, गरीब विद्यार्थ्याला गणवेश, वह्या-पुस्तकं घेऊन देणं, हा त्याचा नित्यक्रम. चिंधी-बाजारातले जुने कपडे सत्यपाल स्वत: घालतो आणि गरीब विद्यार्थ्यांना नवीन कपडे घेऊन देत असतो.

**कीर्तन-प्रबोधनाच्या कार्यक्रमातून**
**लाखो रुपये त्याला सहज कमावता**
**आले असते, पण धनसंचय करणं**
**त्याने जाणीवपूर्वक टाळलं.**
**जेथून आपण आलो ती नाळ तुटू नये,**
**'महाराज' या उपाधीचा संसर्ग होऊ नये**
**यासाठी आपलं सामान्यत्व जपणारा सत्यपाल**
**आकोटच्या बाजारात कंगवे, गॉगल्स विकताना**
**आपल्याला नेहमी भेटतो. महाराष्ट्रातील**
**ज्या ज्या गावात सत्यपालचं कीर्तन असतं,**
**त्या गावातील माणसं दारू-मांसाहार सोडतात,**
**तरुण हुंडा न घेण्याची शपथ घेतात.**
**कीर्तनासाठी एकवटलेल्या गर्दीच्या**
**बंदोबस्तासाठी असलेला लातूर जिल्ह्यातील**
**मुरुडचा एक पोलिस कीर्तन ऐकून**
**दारू न पिण्याची शपथ घेतो, हे अद्‌भुत**
**सत्यपालच्या कीर्तनातच पाहायला मिळतं.**

कीर्तन-प्रबोधनाच्या कार्यक्रमातून लाखो रुपये त्याला सहज कमावता आले असते, पण धनसंचय करणं त्याने जाणीवपूर्वक टाळलं. जेथून आपण आलो ती नाळ तुटू नये, 'महाराज' या उपाधीचा संसर्ग होऊ नये यासाठी आपलं सामान्यत्व जपणारा सत्यपाल आकोटच्या बाजारात कंगवे, गॉगल्स विकताना आपल्याला नेहमी भेटतो. महाराष्ट्रातील ज्या ज्या गावात सत्यपालचं कीर्तन असतं, त्या गावातील माणसं दारू-मांसाहार सोडतात, तरुण हुंडा न घेण्याची शपथ घेतात. कीर्तनासाठी एकवटलेल्या गर्दीच्या बंदोबस्तासाठी असलेला लातूर जिल्ह्यातील मुरुडचा एक पोलिस कीर्तन ऐकून दारू न पिण्याची शपथ घेतो, हे अद्भुत सत्यपालच्या कीर्तनातच पाहायला मिळतं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गाडगेबाबा हे सत्यपालचे प्राणबिंदू. हे महापुरुष नसते तर मी कुठे असतो? ही त्याची विनम्रता. महिन्यातून २२ दिवस महाराष्ट्रातील कुठल्या ना कुठल्या गावात त्याचे कार्यक्रम असतात. मध्यप्रदेश, आंध्रप्रदेशातही त्याचा मोठा चाहता वर्ग आहे. 'ग्रामगीता' ही त्याच्या जीवनाची दिशा, सोबतीला बाबासाहेबांच्या राज्यघटनेचं बळ. 'पोथ्यांची पारायणं करण्याऐवजी राज्यघटनेचं पारायण करा' असं पोटतिडिकीनं सांगणारा सत्यपाल खऱ्या अर्थाने दलित-बहुजन समाजात 'आयडॉल' आहे.

'शिक्षणाचा अभाव', हा दलित-बहुजन समाजाच्या प्रगतीतील सर्वांत मोठा अडसर आहे, हे कटू वास्तव सत्यपालला ठाऊक आहे. त्यामुळेच शिक्षणापासून कुणी वंचित राहू नये, हा त्याच्या जीवनाचा ध्यास. 'कुणी न राहावे खुळे-अडाणी, शिक्षण घ्यावे, व्हावे ज्ञानी' हे गाडगेबाबांचं भजन म्हणताना त्याच्या डोळ्यांतून ओघळणारे अश्रू त्याच्या प्रामाणिक तळमळीचे निदर्शक असतात.

सत्यपाल हा उपेक्षित समाजाचं प्राक्तन मांडतो. त्यामुळे तोसुद्धा माध्यमांच्या दृष्टीने उपेक्षितच. स्वाभाविकच विविध वाहिन्यांवर रोज सकाळी होणाऱ्या महाराजांच्या गर्दीत सत्यपाल दिसत नाही. वर्तमानपत्रातील रकान्यांत त्याचे फोटोही बघायला मिळत नाहीत.... भूषण,.... रत्न अशा पुरस्कारांचा मानकरीही तो कधी ठरत नाही. म्हणूनच दहा हजार कार्यक्रमांच्या विक्रमाचं अप्रूप विसरून गावागावांतील माणूस जागविण्यासाठी, माणूसपणाची धग जिवंत ठेवण्यासाठी सत्यपालची धडपड सुरू असते. हीच धडपड समाजातील अभावग्रस्तांना जागवण्याचं काम करीत आहे. एखाद्या निष्कांचन कार्यकर्त्याच्या कार्याचं मोठेपण यापेक्षा दुसरं कोणतं असू शकेल?

गजानन जानभोर
संपादक, लोकमत, अकोला आवृत्ती,
लोकमत कार्यालय, अकोला.
Mob. 9850304159